# जिल्हाधिकारी कार्यालय अहमदनगर

**(आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन शाखा)**

scy.ahmednagar@gmail.com (टोल फ्री क्र.1077) दुरध्वनी क्र. 0241-2343600

---

**विषय - कोरोना विषाणू (कोव्हीड19) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपयायोजना करण्याबाबत.**

**वाचावे** - 1. आपत्ती व्यावस्थापन कायदा, 2005.

2. साथ रोग अधिनियम 1897

3. सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्याकडील आधिसुचनाकोरोना2020/प्र.क्र.58/आरोग्य5 दिनांक 14/03/2020.

4. गृह मंत्रालय, भारत सरकार यांच्याकडील आदेश क्रमांक 40-3/2020-डीएम-1(अ) दि.15/04/2020

क्र. आव्यमपु/कार्या 19अ/ 317 /2020 **आदेश** अहमदनगर दि. 16 /04/2020

ज्याअर्थी, राज्य शासनाने कोरोना विषाणूचा (कोव्हीड 19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायादा 1897 दिनांक 13 मार्च 2020 पासून लागू करुन खंड 2,3,4 मधील तरतुदीनुसार अधिसुचना निर्गमित केलेली आहे. त्याअन्वये जिल्हाधिकारी हे त्यांचे कार्यक्षेत्रात कोव्हीड-19 वर नियंत्रण आणण्यासाठी व त्यांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी सक्षम प्राधिकारी घोषीत करण्यात आलेले आहे.

ज्याअर्थी, संदर्भ क्र. 4 अन्वये मा.भारत सरकार यांनी त्यांच्याकडील आदेशान्वये कोव्हिड 19 चा प्रतिबंध होण्याकामी मार्गदर्शन करण्यात आलेले असून त्याबाबत कार्यवाही करण्याबाबत जिल्हाधिकारी यांना निर्देश दिलेले आहे.

त्याअर्थी, मी जिल्हाधिकारी अहमदनगर आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 मधील कलम 30 व साथ रोग अधिनियम 1897 अन्वये निर्गमित करण्यात आलेली अधिसूचना व नियमावलीमधील तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार खालील बाबींचे पालन करण्याकामी आदेशीत करीत आहे.

**<u>सार्वजनिक जागा (Public Spaces )</u>**

1. सर्व सार्वजनिक ठिकाणी, कामाच्या ठिकाणी मास्क वापरणे अनिवार्य आहे.
2. सार्वजनिक ठिकाणे, कामाची ठिकाणे आणि वाहतुकीचे ठिकाणांचे प्रभारी यांनी त्याठिकाणी Social Distancing चे पालन होईल याबाबत दक्षता घ्यावी.
3. सार्वजनिक ठिकाणी कोणत्याही संघटनेने / व्यवस्थापकाने 5 किंवा त्यापेक्षा जास्त व्यक्तींना एकत्र जमण्याची परवानगी देऊ नये.
4. विवाह आणि अंत्यसंस्कार याठिकाणी गर्दी जमणार नाही याबाबत नियमन करावे.
5. सार्वजनिक ठिकाणी थुंकणा-यास संबंधीत प्राधिकरणाने दंडासह शिक्षा करावी.
6. दारू, गुटखा, तंबाखू इत्यादींच्या विक्रीवर बंदी असल्याने त्याचे सक्तीने पालन करावे व सार्वजनिक ठिकाणी कोणीही थुंकू नये याची दक्षता घ्यावी.

**कामाची जागा (Work Spaces )**

7. सर्व कामाच्या ठिकाणी तापमान तपासणीसाठी (Tempreture Screening) पुरेशी व्यवस्था करावी आणि सोयीस्कर ठिकाणी सॅनिटायझर्स पुरवावेत व हात धुण्याच्या ठिकाणांची संख्या वाढवावी.
8. कामाच्या ठिकाणी शिफ्ट दरम्यान एक तासाचे अंतर ठेवावे तसेच कर्मचारी यांच्या जेवणाच्या वेळ्या ठरवून द्याव्यात जेणेकरुन Social Distancing चे पालन होईल.
9. 65 वर्षांपेक्षा जास्त वयोगटातील व्यक्ती आणि 5 वर्षापेक्षा कमी वयाच्या मुलांच्या पालकांना घरुन काम करण्यास प्रोत्साहित करावे.
10. सर्व खासगी व सार्वजनिक कर्मचारी यांना आरोग्य सेतूच्या वापरास प्रोत्साहित करावे.
11. सर्व संस्थांनी त्यांचे कामाची जागा शिफ्ट दरम्यान स्वच्छ करावयात.
12. मोठ्या संमेलने / बैठका प्रतिबंधित कराव्यात.

**उत्पादक आस्थापना (Manufacturing Establishments )**

13. हाताळण्यात येणा-या पृष्ठभागांची वारंवार साफसफाई करणे आणि सर्वांना हात धुणे अनिवार्य करावे.
14. कॅन्टीनमध्ये Social Distancing चे पालन होण्याकरीता कामाचे शिफ्ट आणि कर्मचारी यांच्या भोजणांच्या वेळांमध्ये Overlap होणार नाही याची दक्षता घ्यावी.
15. चांगल्या स्वच्छता पद्धतींबाबत (good hygiene practices) सखोल संवाद आणि प्रशिक्षण आयोजित करावे.

कोणतीही व्यक्ती/संस्था/संघटना यांनी उक्त आदेशाचे उल्लंघन केल्यास ते आपत्ती व्यवस्थापन कायदा मधील कलम 51 ते 60 तसेच भारतीय दंड संहिता (45 ऑफ 1860) च्या कलम 188 नुसार दंडनिय / कायदेशीर कारवाईस पात्र राहतील.

जिल्हाधिकारी
अहमदनगर

(राहुल द्विवेदी)
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, अहमदनगर**

प्रत - 1) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांचेकडेस पुढील कार्यवाहीसाठी
2) जिल्हा पोलीस अधिक्षक, अहमदनगर यांना पुढील कार्यवाहीसाठी
3) आयुक्त, महानगरपालिका, अहमदनगर यांना पुढील कार्यवाहीसाठी
4) जिल्हा माहिती अधिकारी, अहमदनगर यांना पुढील कार्यवाहीसाठी
5) उपविभागीय दंडाधिकारी (सर्व)_______________ यांचेकडेस पुढील कार्यवाहीसाठी
6) तालुका दंडाधिकारी (सर्व)_______________ यांचेकडेस पुढील कार्यवाहीसाठी
7) मुख्याधिकारी नगरपालिका/नगरपरिषद/नगरपंचायत (सर्व)_______________ यांचेकडेस कार्यवाहीसाठी